# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.06.2025** **वार:गुरुवार**

---

1. संविधान हत्या दिवसानिमित्त देशभरात आणीबाणीतल्या पीडितांना श्रद्धांजली
2. पंतप्रधानांकडून खाणकाम, रेल्वे, जलसंपदा यांच्याशी निगडीत प्रमुख प्रकल्पांचा आढावा
3. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची दहावीची परीक्षा पुढील वर्षापासून दोन संत्रांमध्ये होणार
4. शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षणमंत्र्याच्या बैठकीत दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका स्पष्ट आणि
5. येत्या 7 दिवसांत देशाच्या वायव्य, मध्य, पूर्व आणि ईशान्य भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज

**<u>पंतप्रधान- संविधान हत्या दिवस</u>**

संविधान हत्या दिवस काल देशभरात पाळण्यात आला. 1975 मध्ये 25 जून रोजी तत्कालीन केंद्र सरकारने देशभरात आणीबाणी लागू करत, संविधानाचा अवमान केला होता. त्या दुर्दैवी दिवसाला काल 50 वर्षे पूर्ण झाली. आणीबाणीमधील अत्याचार पीडीतांना काल देशभरात श्रद्धांजली वाहाण्यात आली. या काळात जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी आणि इतर विरोधी नेत्यांना अंतर्गत सुरक्षा देखभाल कायदा म्हणजेच मिसा अंतर्गत अटक करण्यात आली होती. याविषयी पंतप्रधानांनी मन की बात या कार्यक्रमात आपले मत मांडताना, देशवासियांनी अत्याचार सहन करूनही त्यांचा संविधानावरील विश्वास कायम राहिला होता, असे म्हटले होते. आणीबाणीच्या 21 महिन्यांच्या काळात नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर प्रतिबंध लागू करण्यात आले होते. तसेच अनेकांना नजरकैदेत ठवण्यात आले होते. तसेच माध्यमांवर निर्बंध लागू करण्यात आले होते. आणीबाणीतील अत्याचारांना बळी पडलेल्या सर्व व्यक्तींना काल देशभरात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. केंद्रिय मंत्रीमंडळाच्या बैठकीतही दोन मिनिटांचं मौन पाळून आणीबाणीतल्या योद्ध्यांना आदरांजली वाहण्यात आली. संविधान हत्या दिनानिमित्त राज्यात मुंबईतल्या राजभवनात आयोजित केलेल्या कार्यक्रमाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य मंत्रीमंडळातील अन्य मंत्री उपस्थित होते. आणीबाणीच्या काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी लढलेल्या लोकांमुळेच भारतातली लोकशाही टिकून राहिल्याचं मत राज्यपालांनी यावेळी व्यक्त केलं. या कार्यक्रमात आणीबाणीच्या वेळी लढलेल्या नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

**<u>शहा-आणीबाणी पुस्तक</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल दिल्लीत 'द इमर्जन्सी डायरीज- इअर्स दॅट फोर्ज्ड अ लीडर' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. आणीबाणी विरोधातल्या लढाईत तत्कालीन संघस्वयंसेवक आणि विद्यमान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लक्षवेधी भूमिका उलगडण्यात आली आहे. लोकशाहीच्या आदर्शांसाठी लढणाऱ्या मोदी यांचे आणि लोकशाहीच्या जतन आणि प्रसारासाठी त्यांनी आयुष्यभर केलेल्या कामाचे चित्रण यामध्ये करण्यात आले आहे. हे पुस्तक मोदी यांच्यासमवेत काम कऱणाऱ्या सहकार्यांच्या वैयक्तित अनुभवावर तसेच संग्रहित साहित्यावर आधारित आहे.

**<u>पंतप्रधान-आढावा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सुशासन आणि प्रकल्पांच्या कालबद्ध अंमलबजावणीसाठी तयार केलेल्या प्रगती मंचाच्या 48 व्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. खाणकाम, रेल्वे, जलसंपदा यांच्याशी निगडीत प्रमुख प्रकल्पांचा आढावा घेतला. आर्थिक विकास आणि लोकहिताच्या दृष्टीकोनातून हे प्रकल्प महत्त्वाचे आहेत. या बैठकीत प्रकल्पपूर्तीची कालमर्यादा, संस्थांतर्गत समन्वयन आणि विविध समस्यांचे निराकरण यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. प्रकल्प पूर्ण होण्यात लागणाऱ्या विलंबामुळे आर्थिक बोजा वाढतो आणि नागरिकांना आवश्यक सेवा आणि सुविधा वेळेवर मिळण्यात अडथळा निर्माण होत असल्याचं यावेळी मोदी म्हणाले. आयुष्मान भारत अभियानाचा आढावा घेताना मोदींनी सर्व राज्यांना जलदगतीने आरोग्य पायाभूत सुविधा विकसित करण्याचे तसेच आकांक्षित जिल्ह्यांवर लक्ष केंद्रीत करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले. गरीब आणि वंचितांना दर्जेदार आरोग्यसेवेची समान उपलब्धता सुनिश्चित झाली पाहिजे असेही ते म्हणाले.

**<u>सीबीएसई</u>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं पुढील वर्षापासून दहावीच्या परीक्षा दोन सत्रांमध्ये घेण्याचं जाहीर केलं आहे. प्रारंभिक परीक्षा फेब्रुवारीमध्ये घेतली जाईल ती सर्व विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असेल. मे महिन्यात होणारी परीक्षा कामगिरीत वाढ करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक असेल. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, सामाजिक विज्ञान आणि भाषा या तीन विषयांपैकी कोणत्याही विषयात त्यांची कामगिरी सुधारण्याची परवानगी असेल. दोन्ही टप्प्यांचे निकाल अनुक्रमे एप्रिल आणि जूनमध्ये जाहीर केले जातील.

**<u>राजनाथ-चीन</u>**

चीनच्या किंगदाओ प्रांतात शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांच्या संरक्षणमंत्र्यांची बैठक पार पडली. दहशतवाद हा शांततेच्या मार्गातला अडथळा असल्याचे सांगून तो आम्ही सहन करणार नाही असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी या बैठकीला संबोधित केले. दहशतवादाला न्यायाच्या चौकटीत आणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. दहशतवादाशी मुकाबला करण्यासाठी मोठी कारवाई करण्याची गरज होती असे सांगून, भारताने ऑपरेशन सिंदूर यशस्वीरित्या राबवत सीमापार दहशतावादी ठिकाणे नष्ट केल्याचे सिंग म्हणाले. भारताच्या दहशतावादाविरोधातल्या शून्य सहिष्णतूच्या धोरणाचा पुनरूच्चार राजनाथ सिंग यांनी यावेळी केला. शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीला उपस्थित राहाण्यासाठी राजनाथ सिंग काल संध्याकाळी चीनमध्ये पोहोचले. राजनाथ सिंह शांघाय सहकार्य संघटनेअंतर्गत व्यापार, आर्थिक सहकार्य आणि संपर्कजाळ्याच्या गरजेवर भर देतील. तसेच, चीन आणि रशियासह अनेक सहभागी देशांच्या समपदस्थ अधिकाऱ्यांशी द्विपक्षीय चर्चा देखील करतील. कझाकस्तान, चीन, किर्गिस्तान, पाकिस्तान, रशिया, ताजिकिस्तान, उझबेकिस्तान, इराण, बेलारूस आणि भारत यांचा समावेश असलेल्या संघटनेच्या बैठकीचे अध्यक्षपद यावर्षी चीनकडे आहे.

**बटाटा-केंद्र**

उत्तर प्रदेशातील आग्रा इथं, आंतरराष्ट्रीय बटाटा दक्षिण आशिया प्रादेशिक केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाबाबत माध्यमांना सांगितलं की या बटाटा केंद्रामुळे बटाटा आणि रताळ्याची उत्पादकता तसेच कापणीनंतरचे व्यवस्थापन आणि दरवाढ होऊन अन्न आणि पोषण सुरक्षा तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल तसेच रोजगार निर्मितीस चालना मिळेल. झारखंडमधील झारिया कोळसा क्षेत्राच्या पुनर्वसनासाठी सुधारित आराखड्याला सरकारने मान्यता दिली असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच, महाराष्ट्रात, साडेतीन हजार कोटीपेक्षा अधिक खर्चाच्या पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातल्या विस्तारीकरण प्रस्तावाला मान्यता दिली असून, 13 स्थानकांसह थोडं कमी तेरा किलोमीटर अतिरिक्त लांबीचा मार्ग जोडला जाईल.

**अमली पदार्थ**

जागतिक पातळीवर अमली पदार्थांचा गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधात अमली पदार्थ विरोधी दिन पाळण्यात येत आहे. अमलीपदार्थ मुक्त समाजाचे ध्येय साध्य करण्याच्या हेतून हा दिवस साजरा केला जातो.

**ट्रम्प-इराण**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या अणुउर्जा प्रकल्प नष्ट केला नसल्याचा दावा करणारा अहवाल फेटाळून लावला आहे. अमेरिकेच्या सीएनएन आणि न्यू यॉर्क टाइम्स या दोन माध्यमांनी उघड केलेल्या गुप्तचर अहवालात, अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात इराणाचा अणूउर्जा कार्यक्रम उद्धवस्त झाल्याचा दाव्यावर शंका उपस्थित करण्यात आली होती. समाज माध्यमांवरील संदेशात, काल ट्रम्प यांनी या माध्यमांवर टीका केली. या माध्यमांनी लष्कराच्या सर्वांत यशस्वी लष्करी हल्ल्यांपैकी एक असलेल्या हल्ल्याला कमी लेखण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

**इराण-अणुउर्जा**

दरम्यान, इराणने काल संयुक्त राष्ट्रांची अणुउर्जा निरीक्षण संस्था, आंतरराष्ट्रीय अणुउर्जा एजन्सीसोबतचे संबंध तोडले आहेत. इराणच्या संसदेने याविषयीच्या विधेयकाला काल मंजुरी दिली. अमेरिकेने इराणच्या तीन अणुस्थळांवर केलेल्या हल्ल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचं स्थानिक इराणी माध्यमांनी दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे.

**भारत-व्हिएतनाम**

भारत आणि व्हिएतनाममधील तेरावा राजकीय सल्लामसलत आणि दहावा धोरणात्मक संवाद काल नवी दिल्लीत परराष्ट्र मंत्रालयाचे पी. कुमारन आणि व्हिएतनामचे उपपरराष्ट्र मंत्री गुयेन मान कुओंग यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली पार पडला. राजकीय सल्लामसलतीदरम्यान, दोन्ही बाजूंनी भारत-व्हिएतनाम व्यापक धोरणात्मक भागीदारीतील प्रगतीचा आढावा घेतला. धोरणात्मक संवादादरम्यान, दोन्ही बाजूंनी परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण केली. सीमापार दहशतवादासह सर्व प्रकारच्या दहशतवादाचा स्पष्टपणे

निषेध केला.

**हॉकी**

बर्लिनमध्ये सुरू असलेल्या चार राष्ट्रांच्या स्पर्धेत काल भारतीय कनिष्ठ पुरुष हॉकी संघानं तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत ऑस्ट्रेलियावर 2-1 असा विजय मिळवला. बावनाव्या मिनिटाला अजित यादवनं ओपन प्लेमध्ये गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली आणि विजयावर शिक्कामोर्तब केलं.

**17 वर्षांखालील महिला कुस्ती**

व्हिएतनाममधील वुंग ताऊ इथं झालेल्या 17 वर्षांखालील आशियाई कुस्ती स्पर्धेत भारतीय 17 वर्षांखालील महिला कुस्ती संघ विजेता ठरला. व्हिएतनाममधील 23 वर्षांखालील वरिष्ठ आशियाई कुस्ती स्पर्धेत 23 वर्षांखालील महिला कुस्ती संघाच्या विजयानंतर, 17 वर्षांखालील महिला कुस्तीपटूंनी विजय मिळवताना धैर्य, दृढनिश्चय आणि कौशल्याचं प्रदर्शन केलं. भारतीय महिला संघानं पाच सुवर्ण पदकांसह एकंदर दहा पदकं जिंकली.

**हवामान**

भारत हवामान विभागानं पुढील 7 दिवसांत देशाच्या वायव्य, मध्य, पूर्व आणि ईशान्य भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. कर्नाटकच्या किनारी, पूर्व राजस्थान, झारखंड, केरळ, माहे, मध्य महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, पंजाब, तामिळनाडू, पुद्दुचेरी, करईकल आणि उत्तराखंडमध्ये आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**